# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – १३ एप्रिल २०१६

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रीय प्रेरणास्त्रोत

मुंबई – संपन्न व सुदृढ राष्ट्राच्या उभारणीमध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान मोलाचे आहे. आज भारत जगाच्या नकाशावर एक मोठे राष्ट्र म्हणून उदयास येत असून ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय , सामाजिक,राष्ट्रीय, आणि आर्थिक धोरणामुळे भारत जगात महासत्ता म्हणून उदयास येत असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रीय प्रेरणास्त्रोत असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केले. समाजाच्या सर्वांगिण विकासामध्ये व सुजलाम सुफलाम देशाच्या निर्मितीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मोठे योगदान असून देशाला एकसंघ ठेवण्यासाठी त्यांचा मोठा वाटा असल्याचेही त्यांनी नमुद केले.

मुंबई विद्यापीठाच्या वतीने महात्मा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सयुंक्त जयंती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, सप्ताहाच्या आजच्या कार्यक्रमात “ डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे राष्ट्रीय धोरण : सामाजिक ,आर्थिक ,राजकीय आणि धार्मिक स्थिती” या विषयांवरील परिसंवादामध्ये ते बोलत होते. पुढे ते म्हणाले की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रीय नेतृत्व म्हणून सर्व जगाने मान्य केले असून त्यांना एका विशिष्ट चौकटित अडकवून ठेवणे अयोग्य आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा व्यापक दृष्टिकोन हा आजही देशाच्या सामाजिक,आर्थिक आणि राजकीय ध्येयधोरण निश्चितीसाठी मार्गदर्शक तत्वे म्हणून सर्वज्ञात ठरत आहे. तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सव,१२५ वी जयंती साजरी करतानाच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचाही जल्लोष साजरा करावा असे आवाहन क्रांती खोब्रागडे, उपायुक्त आयकर विभाग यांनी केले. बाबासाहेबांचे विचार हे आत्मविश्वास वाढवित असून, विपरीत परिस्थीतीवर मात करण्याचे सामर्थ्य त्यांच्या विचारात दडले असल्याचे क्रांती खोब्रागडे यांनी सांगितले. आपल्या हातून अधिकाअधिक समाजकार्य घडविण्यावर तरुणांनी लक्ष केंद्रीत करण्याचेही त्यांनी सांगितले. या परिसंवादासाठी विशेष आमंत्रित म्हणून उच्च व तंत्र शिक्षण विभाग ,महाराष्ट्र शासनाचे उपसचिव सिध्दार्थ खरात यांची प्रमुख उपस्थिती होती.

या एकदिवसीय परिसंवादामध्ये बुध्दा एंड हिज धम्मा, रिलीजीअस इस्यूस इन कंटेंपररी  कॉन्टेक्स्ट, फिलॉसॉफिकल परस्पेक्टीव ऑफ आंबेडकरीजम, डॉ.आंबेडकर अँड नॅशनलीजम, डॉ.आंबेडकर अँड फॉरेन पॉलिसी, रीलीजीअर डिसकोर्स अँड बुध्दीजम, फुले आंबेडकर विचारधारा आणि स्त्रीवाद, या विषयांवर अनेक मान्यवरांनी आपले मत मांडले.

मुंबई विद्यापीठाच्या जे.पी.नायक भवन येथे या परिसंवदाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादासाठी समन्वयकाची भूमिका प्रा.डॉ.संगीता पवार यांनी पार पाडली.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क / प्रकाशन / सांख्यिकी )